**<u>महाराष्ट्र ज्ञान महामंडळ</u>**
**<u>स्थापन करण्याबाबत</u>**

# <u>महाराष्ट्र शासन</u>

उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.मातंत्र ३७००/(१३२/२०००)/भाग-ड/तांशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक : ६जून,२००१.

<u>प्रस्तावना:-</u>

जगभरात माहिती तंत्रज्ञान या विषयांत क्रांती सुरू झाली असून सदर विषय जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये परिणाम करित आहे. विशेषतः आर्थिक व व्यापारी क्षेत्रामध्ये त्याचे परिणाम जबरदस्त व जलद गतीने होत असून, आजच्या पेक्षा उद्याचा समाज या बदलांमुळे सर्वस्वी भित असणार आहे. तसेच या परिणामांमुळे आजच्या प्रणाली बदलणार आहेत. या होऊ घातलेल्या बदलास योग्य अशी मानसिकता उद्याच्या नागरिकांमध्ये निर्माण होऊन त्याच्या जोडीला माहिती तंत्रज्ञान या विषयाचे ज्ञान व कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये असणे अत्यंत आवश्यक आहे. सध्या महाराष्ट्र राज्यातील काही अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने माहिती तंत्रज्ञान अभ्यासक्रमांतर्गत पदवी व पदविका शिक्षण देत आहेत. शहरी भागात काही विद्यार्थी भरमसाठ फी देऊन माहिती तंत्रज्ञानाच्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतात. तथापि, बहुतांश विद्यार्थी माहिती तंत्रज्ञान या विषयाबाबत अद्यापही अनभिज्ञ आहेत.

सध्या उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत एकूण २००० शैक्षणिक संस्था कार्यरत असून तेथे १०लक्ष विद्यार्थी व ५०,००० प्राध्यापकांची संख्या आहे. उपक्रमाच्या अंमलबजावणीचा पहिला टप्पा म्हणून राज्यातील सर्व महाविद्यालये तंत्रनिकेतने, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना "महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान प्रमाणपत्र'' अभ्यासक्रम खाजगी संस्थांमार्फत पहिल्या टप्प्यात शासकीय शैक्षणिक संस्थांमध्ये सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आला आहे.

दुसऱ्या टप्प्यात उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत सर्व विद्यापीठे, शैक्षणिक संस्था यांना संगणक जाळयाद्वारे जोडून विद्यापीठातील प्रचलित पारंपरिक अभ्यासक्रम व तसेच नव्याने अस्तित्वात येणारे विविध अभ्यासक्रमाचे शिक्षण माहिती तंत्रज्ञानाद्वारे प्रदान करून शिक्षणाचा दर्जा उंचाविण्याच्या उद्दिष्टाने महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित नावाची कंपनी स्थापन करण्याचा शासनाचा विचार होता.

शासन निर्णय :-

१) सदर आदेशान्वये "महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित" नावाची कंपनी, कंपनी कायदा, १९५६ अन्वये स्थापन करण्यास व कार्यान्वित करण्यास प्रस्तावित मेमोरॅंडम ऑफ असोसिएशन आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशनला शासनाकडून मान्यता देण्यात येत आहे.

अ) या महामंडळाने माहिती तंत्रज्ञानाद्वारे उच्च व तंत्रशिक्षणात आमूलाग्र बदल घडवून नवीन आयाम प्राप्त करून देण्यासाठी सर्व शैक्षणिक संस्था त्यांच्या वर्गखोल्या, विद्यापीठे यांना संगणकाद्वारे जोडून "महायशनेट" नावाचे संगणकीय जाळे निर्माण करावे.

ब) या "महायशनेट" च्या माध्यमातून विद्यापीठे, शैक्षणिक संस्था व यातील विद्यार्थी यांना दृकश्राव्य माध्यमांचा शिक्षण क्षेत्रात उपयोग करून घेण्यासाठी तसेच आधुनिक अभ्यासक्रमांचा अभ्यास करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचे "हायटेक रिसोर्स सेंटर" निर्माण करावे.

क) माहिती तंत्रज्ञानाद्वारे शिक्षणासाठी विविध प्रकारचे साहित्य निर्माण करणे व अशा साहित्याच्या वापरासाठी विद्यार्थी व प्राध्यापकांना उद्युक्त करावे.

ड) या अंतर्गत शैक्षणिक साहित्य, Multimedia, संगणकीय प्रणाली, संगणकीय जाळे, Internet Technology, वेबसाईट Designing, E-commerce, Computer Aided Designs (CAD) इ.बाबींचा पुरस्कार प्रचार व आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या सहाय्याने निर्मिती व व्यापार करावा.

२) या महामंडळाने रू.१० कोटीचा निधी उभा करावा.

३) यापैकी रु.५ कोटी इतका निधी शेअर्सद्वारे उभा करण्यांत यावा. त्यामध्ये शासनाची रु.२.३ कोटी (४६%), विद्यापीठे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कार्यरत उद्योग, शैक्षणिक संस्था, अन्य व्यक्ती यांची रु.२.७कोटी (५४%) इतकी गुंतवणूक असावी.

४) महामंडळ अस्तित्वात आल्यानंतर ३ वर्षांच्या कालावधीत शासनाने गुंतविलेली रू.५कोटी इतकी रक्कम महामंडळाने परत द्यावी व शासनाने या महामंडळातील स्वतःची गुंतवणूक ही ४६% वरून २६% आणावी. या गुंतवणूकीसाठी सुरूवातीच्या रू.५कोटी वरील नफ्याचा विनियोग करावा.

५) सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे संचालक मंडळ प्रस्तावित करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १) पदसिध्द व शासन नियुक्त संचालक -- | ३ |
| २) विद्यापीठाच्या कुलगुरू मधून त्यांनी निवडलेले प्रतिनिधी -- | २ |
| ३) माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कार्यरत उद्योगाचा निवडलेला प्रतिनिधी-- | १ |
| ४) शिक्षण संस्थांनी त्यांच्यामधून निवडलेला शिक्षण तज्ञ संचालक -- | १ |
| ५) वरील भागधारका व्यतिरिक्त उर्वरित भागधारकामधून निवडलेला संचालक -- | १ |
| ६) पूर्णवेळ तज्ञ संचालक (वित्त) यांची नियुक्ती प्रथम शासनातर्फे ३ वर्षासाठी राज्य अथवा केंद्र शासनाच्या महाराष्ट्र ट्रेझरी आणि अकाऊंटस, इंडियन ऑडीट ॲण्ड अकाऊंटस सर्व्हीस आणि रेल्वे अकाऊंटस सर्व्हीस यामधील वरिष्ठ अधिकाऱ्याची किंवा आर्थिक क्षेत्रातील योग्य खाजगी तज्ञाची नियुक्ती करण्यात येईल. त्यानंतर संचालक मंडळ योग्य तज्ञ व्यक्तीस संचालक म्हणून पूर्णवेळ संचालक (वित्त) म्हणून नेमणूक करेल. ---- | १ |
| **एकूण ---** | **९** |

६) सुरूवातीला महामंडळ स्थापन करताना शासन संचालक मंडळ नियुक्त करेल. हे संचालक मंडळ ३ वर्षासाठी असेल.

७) शासनातर्फे नियुक्त करण्यात येणारे ३ संचालक हे खालीलप्रमाणे असावेत.

- राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री -
- राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री
- राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव -
- प्रथमतः शासनाकडून नियुक्त करण्यात येणारे व नंतर संचालक मंडळाद्वारे नियुक्त केले जाणारे संचालक (वित्त)-- ३ वर्षाच्या कालावधीसाठी सदस्य

८) शासनाकडून नियुक्त करण्यात येणाऱ्या पूर्णवेळ तज्ञ संचालक (वित्त) यांची नियुक्ती ही प्रत्येक ३ वर्षाकरिता असेल.

९) संचालक मंडळाचा अध्यक्ष संचालक मंडळाने त्याच्यामधून निवडावा.

१०) संचालक मंडळाने आवश्यकतेनुसार संचालक मंडळातून पूर्ण वेळ कार्यकारी संचालकांची निवड करावी.

११) महामंडळाच्या दैनंदिन कामकाजासाठी लागणारे अधिकारी / कर्मचारी यांच्याकरिता व प्रशासकीय कामाकरिता येणारा वार्षिक अंदाजे खर्च रू.१२लाख व्याजाच्या रकमेतून भागविण्यात यावा.

१२) शैक्षणिक संस्थांमध्ये सध्या सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम (MS-CIT) व महाराष्ट्र राज्य प्रगत माहिती तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम (MSA-CIT) या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षापासून नव्याने स्थापन होणाऱ्या सर्व NAC केंद्राच्या शुल्कामधील १०% हिस्सा कंपनीकडे जाईल.

१३) महामंडळाच्या कोणत्याही प्रकारच्या आर्थिक जबाबदारीसाठी अथवा प्रशासकीय कामासाठीची हमी शासनाकडून देण्यात येणार नाही.

१४) सदरच्या प्रस्तावित महामंडळातील भागधारकांची Liability मर्यादित राहील.

१५) सुरूवातीची ४/५ वर्षे किंवा जोपर्यंत महामंडळ पुरेसा नफा मिळवित नाही तोपर्यंत व आवश्यक असल्यास त्यानंतरही महामंडळाने स्वनिर्मितीच्या ऐवजी सध्या बाजारात विपुलतेने उपलब्ध असलेल्या दृकश्राव्य साहित्याचा तज्ञांमार्फत तौलनिक अभ्यास करून विविध अभ्यासक्रमाकरिता किंवा विषयाकरिता योग्य साहित्याबाबत निविदा मागवून ते साहित्य, विद्यार्थी, महाविद्यालये व विद्यापीठांना उपलब्ध करून द्यावे व याचा अंतर्भाव महामंडळाच्या मेमोरंडम ऑफ असोसिएशन व आर्टीकल्स ऑफ असोसिएशन्स मध्ये अंतर्भूत करण्यात यावा.

१६) महामंडळाने इच्छुक संस्थेस Network Access (N.A.C.) मध्ये व्हीडीओ कॉन्फरन्सींगसह माहिती तंत्रज्ञानाद्वारे शिक्षणाच्या सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. सदर उभारणीसाठी प्रथमतः अशी इच्छुक संस्था **MSCIT** च्या शुल्काच्या २०% भागातून खर्च करील. तथापि, सदर २०% रक्कम कमी पडल्यास व संस्थेने कंपनीकडे मागणी केल्यास महामंडळाकडून कर्ज देण्यात यावे. या कर्जाचे हप्ते संस्थेने न दिल्यास महाराष्ट्र शासन संबंधित संस्थेच्या वेतनेतर अनुदानातून सदर रक्कम वळती करून महामंडळास देईल. याचा अंतर्भाव महामंडळाच्या मेमोरंडम ऑफ असोसिएशन व आर्टीकल्स ऑफ असोसिएशन्स मध्ये करण्यात यावा.

१७) वर प्रस्तावित केल्याप्रमाणे महामंडळातील संचालक मंडळाची संरचना व उद्दिष्टे भविष्यात देखील कायम स्वरूपी अबाधित राखावी व अशा प्रकारची तरतुद महामंडळाच्या मेमोरंडम ऑफ असोसिएशन व आर्टीकल्स ऑफ असोसिएशन्स मध्ये अंतर्भूत करण्यात यावी.

१८) या महामंडळाचे सर्व कार्यक्रम विद्यापीठे, शैक्षणिक संस्था व विद्यार्थी इ. सर्वांकरिता ऐच्छिक स्वरूपाचे असून त्याकरिता महामंडळाने निश्चित केलेले शुल्क सर्व लाभार्थींना स्वतंत्रपणे द्यावे लागेल. याचा अंतर्भाव देखील महामंडळाच्या मेमोरंडम ऑफ असोसिएशन व आर्टीकल्स ऑफ असोसिएशन्स मध्ये अंतर्भूत करण्यात यावा.

१९) सदर आदेशान्वये या महामंडळाच्या स्थापनेसाठी शासनाकडून या महामंडळास रू.५कोटी इतका निधी शासनाचे भागभांडवल म्हणुन उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर महामंडळ त्वरित कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने सदर महामंडळाच्या इन - कॉर्पोरेशनसाठी रू.५लाख व इतर

सुरुवातीच्या अत्यावश्यक दैनंदिन खर्चासाठी व रु.१० लाख असे एकूण रू.१५लाख महामंडळासाठीचा निधी या आदेशान्वये आकस्मिकता निधीतून अग्रिम मंजूर करण्यात येत आहे.

२०) महाराष्ट्र ज्ञान महामंडळाकरिता सध्या उपलब्ध करून देण्यात येत असलेला रू.१५लाख इतका निधी हा तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांपैकी नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये स्थापन करणे या योजनेसाठी राखून ठेवलेल्या रू.७८लाख नियत व्ययामधून रू.९लाख व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचा विकास करणे या योजनेसाठी राखून ठेवलेल्या रू.१०५लाख नियत व्ययामधून रू.६लाख (एकूण रू.१५लाख) इतका निधी वरील योजनांकरिता असेलल्या ठमागणी क्र.डब्ल्यू-३, २२०३, तंत्रशिक्षण - ००१ - संचालन व प्रशासन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (१)(बी) संचालक तंत्रशिक्षण, सहाय्यक अनुदान सांकेतांक नं.२२०३००२२४१ड या अर्थशिर्षाखाली सन २००१-२००२ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा. सदर आदेशान्वये हा निधी संक्षिप्त बिलाद्वारे काढण्यास संचालक, तंत्रशिक्षण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

२१) सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१८८४, दि.२१.५.२००१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( कुमुद बन्सल )<br>
प्रधान सचिव,<br>
उच्च व तंत्रशिक्षण विभाग.

प्रति,

मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.<br>
मा.उपमुख्यमंत्र्याचे सचिव, मंत्रालय, मुंबई.<br>
कुलगुरू, सर्व विद्यापीठे<br>
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.<br>
संचालक, उद्योगधंदे संस्था समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.<br>
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.<br>
संचालक, व्यवसाय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.<br>
संचालक, प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.<br>
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, वांद्रे (पू.), मुंबई.
सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये.
सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये.
सर्व उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, विभागीय कार्यालये.
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
सर्व प्राचार्य शासकीय महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था (संबंधित संचालकांमार्फत)
प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव(लेखा व कोषागार), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव(व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग),
सचिव, वैद्यकीय शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग
विकास आयुक्त, उद्योग संचालनालय,
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (पत्राद्वारे)
उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव.
उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व कार्यासने.
मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव.
मा.प्रधान सचिव (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक.
मा.प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व कार्यासने.
निवडधारिका/तांशि-३.

**महाराष्ट्र शासन**

**„□□¸ ¨¸ ·¸¿°¸¹©¸®¸µ¸ ¹¨¸□¸¸Š¸**
**©¸¸¬¸›¸ ©éš™úœ¸°¸ ÇÅ.Ÿ¸¸·¸¿°¸ 3700/(132/2000)□¸¸Š¸-”/·¸¸¿¹©¸-3**
**Ÿ¸¿°¸¸¥¸¡¸ ¹¨¸¬·¸¸£ □¸¨¸›¸, Ÿé¿□¸ƒÄ-400032.**
**¹™›¸¸¿ˆÅ : 17 □é¥ù,2001.**

¬¸¿™□¸Ä:- ©¸¸¬¸›¸ ¹›¸µ¸Ä¡¸, „□□¸ ¨¸ ·¸¿°¸¹©¸®¸µ¸ ¹¨¸□¸¸Š¸ ÇÅ.Ÿ¸¸·¸¿°¸ 3700/(132/2000)/□¸¸Š¸-”/·¸¸¿¹©¸-3, ¹™.6 □ê›¸,2001.

**<u>शासन शुध्दीपत्र:-</u>**

वरील संदर्भाधीन शासन निर्णयास अनुसरून खालीलप्रमाणे शुध्दीपत्र या आदेशान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

१) उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.३ मध्ये " यापैकी रु.५कोटी इतका निधी शेअर्सद्वारे उभा करण्यांत यावा. त्यामध्ये शासनाची रु.२.३कोटी (४६%), विद्यापीठे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कार्यरत उद्योग, शैक्षणिक संस्था, अन्य व्यक्ती यांची रु.२.७कोटी (५४%) इतकी गुंतवणूक असावी'' असे नमूद केले आहे. या ऐवजी "यापैकी रु.५कोटी इतका निधी शेअर्सद्वारे उभा करण्यांत यावा. त्यामध्ये शासनाची <u>सुरूवातीला</u> रु.२.३कोटी (४६%), विद्यापीठे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कार्यरत उद्योग, शैक्षणिक संस्था, अन्य व्यक्ती यांची रु.२.७कोटी (५४%) इतकी गुंतवणूक असावी'' असे वाचावे.

२) उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयामधील अनु क्र.८ येथील परिच्छेद या शुध्दीपत्राद्वारे अधिक्रमित करून हा परिच्छेद वगळण्यात येत आहे.

३) वरील संदर्भाधीन शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.११ मध्ये "महामंडळाच्या दैनंदिन कामकाजासाठी लागणारे अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता व प्रशासकीय कामाकरिता येणारा वार्षिक अंदाजे खर्च रू.१२लाख व्याजाच्या रकमेतून भागविण्यात यावा'' असे नमूद केले आहे याऐवजी "महामंडळाच्या दैनंदिन कामकाजासाठी लागणारे अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता व प्रशासकीय कामाकरिता येणारा वार्षिक अंदाजे खर्च रू.१२लाख व्याजाच्या रकमेतून किंवा अन्य उत्पतातून भागविण्यात यावा व हा खर्च महामंडळाच्या भागभांडवलातून करण्यात येऊ नये'' असे वाचावे.

४) तसेच उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयामधील अनु क्र. क्र.१५ व १६ येथील परिच्छेदाचा उल्लेख महामंडळाच्या आर्टीकल्स ऑफ असोसिएशन व मेमोरंडम ऑफ असोसिएशन मध्ये स्पष्ट उल्लेख केला असल्याने सदरचे परिच्छेद संदर्भाधीन शासन निर्णयातून वगळण्यात येत आहेत.

५) संदर्भांकित शासन निर्णयामधील परिच्छेद १९ मध्ये "सदर आदेशान्वये या महामंडळाच्या स्थापनेसाठी शासनाकडून या महामंडळास रू.५कोटी इतका निधी शासनाचे भागभांडवल म्हणुन उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर महामंडळ त्वरित कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने सदर महामंडळाच्या इन - कॉर्पोरेशनसाठी रू.५लाख व इतर सुरुवातीच्या अत्यावश्यक दैनंदिन खर्चासाठी व रु.१० लाख असे एकूण रू.१५लाख महामंडळासाठीचा निधी या आदेशान्वये आकस्मिकता निधीतून अग्रिम मंजूर करण्यात येत आहे'' असे नमूद केले आहे. याऐवजी "सदर आदेशान्वये या

महामंडळाच्या स्थापनेसाठी शासनाकडून या महामंडळास रू.५कोटी इतका निधी शासनाचे भागभांडवल म्हणुन उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर महामंडळ त्वरित कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने सदर महामंडळाच्या इन - कॉर्पोरेशनसाठी रू.५लाख व इतर सुरुवातीच्या अत्यावश्यक दैनंदिन खर्चासाठी व रु.१० लाख असे एकूण रू.१५लाख महामंडळासाठीचा निधी शासन ज्ञापन वित्त विभाग क्र.आकनि ११०१/२२/अर्थसंकल्प-६ सांगणक सांकेतांक क्र.८००००२२१ दि.१३.७.२००१ अन्वये आदेशान्वये आकस्मिकता निधीतून अग्रिम मंजूर करण्यात येत आहे'' असे वाचावे.

६) संदर्भांकित शासन निर्णयामधील परिच्छेद २० मध्ये ''महाराष्ट्र ज्ञान महामंडळाकरिता सध्या उपलब्ध करून देण्यात येत असलेला रू.१५लाख इतका निधी हा तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांपैकी नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये स्थापन करणे या योजनेसाठी राखून ठेवलेल्या रू.७८लाख नियत व्ययामधून रू.९लाख व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचा विकास करणे या योजनेसाठी राखून ठेवलेल्या रू.१०५लाख नियत व्ययामधून रू.६लाख (एकूण रू.१५लाख) इतका निधी वरील योजनांकरिता असेलल्या मागणी क्र.डब्ल्यू-३, २२०३, तंत्रशिक्षण - ००१ - संचालन व प्रशासन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (१)(बी) संचालक तंत्रशिक्षण, सहाय्यक अनुदान सांकेतांक नं.२२०३००२२४१ या अर्थशिर्षाखाली सन २००१-२००२ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा. सदर आदेशान्वये हा निधी संक्षिप्त बिलाद्वारे काढण्यास संचालक, तंत्रशिक्षण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे '' असे नमूद केले आहे. याऐवजी ''महाराष्ट्र ज्ञान महामंडळाकरिता सध्या उपलब्ध करून देण्यात येत असलेला रू.१५लाख इतका निधी हा पुरवणी-मागणीद्वारे तरतुद झाल्यानंतर तो तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांपैकी नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये स्थापन करणे या योजनेसाठी राखून ठेवलेल्या रू.७८लाख नियत व्ययामधून रू.९लाख व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचा विकास करणे या योजनेसाठी राखून ठेवलेल्या रू.१०५लाख नियत व्ययामधून रू.६लाख (एकूण रू.१५लाख) इतका निधी वरील योजनांकरिता असलेल्या मागणी क्र.डब्ल्यू-३, २२०३, तंत्रशिक्षण - ००१ - संचालन व प्रशासन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (१)(बी) तंत्रशिक्षण संचालनालयाचे बळकटीकरण करणे (२२०३००३१) या लेखा शिर्षाखाली दर्शविण्यात येईल. सदर आदेशान्वये मंजूर करण्यात आलेला आकस्मिकता निधी काढण्यास संचालक, तंत्रशिक्षण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे '' असे वाचावे.

७) उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयामध्ये परिच्छेद २१ मध्ये ''सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१८८४, दि.२१.५.२००१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे'' असे नमूद केले आहे, याऐवजी आता ''सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४६५/२००१/व्यय-५, दि.३.७.२००१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे'' असे वाचावे.

८) तसेच संदर्भांकित शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.२० नंतर खालील परिच्छेदाचा नव्याने समावेश करण्यात यावा -
संबंधित खर्च हा आकस्मिकता निधी अग्रिमातून खर्ची पडणार असल्यामुळे महाराष्ट्र आकस्मिकता निधी नियमावलीतील नियम क्र.६, ८ व १२ प्रमाणे देयके सादर करताना पुढीलप्रमाणे कार्यवाही व्हावी:-

- आकस्मिकता निधीतून करण्यात येणाऱ्या खर्चासंबधीच्या प्रत्येक प्रमाणकावर तांबडया शाईने रूपये आकस्मिकता निधीतून अशी नोंद घेण्यात यावी.

- जर आकस्मिकता निधीतून मंजूर केलेली रक्कम पूर्ण खर्च होणार नसेल तर अग्रिम रक्कम कमी करण्यासाठी शासनाकडे वेळीच प्रस्ताव सादर करावा.
- आकस्मिकता निधीतून खर्च करण्यात येणाऱ्या रकमेचा सतत खर्च मेळ घालण्यात यावा.
- आकस्मिकता निधीतून केलेल्या खर्चासाठी काढावयाची रक्कम वेगळी बिले पाठवून काढावीत.
- अशा प्रत्येक बिलावर व प्रती पत्रांवर वित्त विभागाने ज्या शासकीय ज्ञापनाद्वारे अग्रिम मंजूर केला त्याचा क्रमांव व दिनांक नमूद करावा.

Ÿ¸-¸£¸« ’ï¸□ø £¸□¡¸œ¸¸¥¸ ¡¸¸¿□¡¸¸ ,¸™½©¸¸›é¬¸¸£¨¸ ›¸¸¨¸¸›ø,

( ˆºÅŸé™ □¸›¬¸¥¸ )
œÏš¸¸›¸ ¬¸¹□¸¨¸¸
„□□¸ ¨¸ ·¸¿°¸¹©¸®¸µ¸

¹¨¸□¸¸Š¸.
œÏ¹·¸¸

मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्र्याचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
कुलगुरू, सर्व विद्यापीठे
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, उद्योगधंदे संस्था समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, व्यवसाय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, वांद्रे (पू.), मुंबई.
सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये.
सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये.
सर्व उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, विभागीय कार्यालये.
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व जिल्हे)
सर्व प्राचार्य शासकीय महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था (संबंधित संचालकांमार्फत)
प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव(लेखा व कोषागार), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव(व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग),
सचिव, वैद्यकीय शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग
विकास आयुक्त, उद्योग संचालनालय,
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (पत्राद्वारे)
मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव.
मा.प्रधान सचिव (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक.
मा.प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव.
उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व कार्यासने.
वित्त विभाग/अर्थसं-६, व्यय-५,
निवडधारिका/तांशि-३.